ISSN No. 2231 - 4342

2014 - 15

# अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद

## २३ वे राष्ट्रीय अधिवेशन

### दि. २-३ नोव्हेंबर २०१४

Scanned by CamScanner

p 418-21

# अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद

संस्था नोंदणी क्र. : 1991/GBBSD/426

22

p. 418 to 421

# संशोधन पत्रिका - २०१४

ISSN No. 2231 - 4342

प्रमुख संपादक
**डॉ. सदाशिव शिवदे**
अध्यक्ष
अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद

संपादक मंडळ
**प्रा. डॉ. ग. का. माने** **प्राचार्य डॉ. टी. एस. पाटील**
**प्रा. डॉ. सौ. विजया साखरे** **प्रा. जे. डी. गोपाळ**
**प्रा. डॉ. प्रशांत देशमुख**

प्रकाशक
**डॉ. संजय चाकणे**
प्राचार्य,
***कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय***
***इंदापूर, जि. पुणे - ४१३१०६***

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| १३. | प्रा. धनंजय जवळेकर | : मराठवाड्यातील पहिले विद्यार्थी आंदोलन - अर्थात वंदे मातरम् चळवळ |
| १४. | प्रा. अतिश माधवराव कदम | : वैदर्भीय समाज क्रांतीचे उद्गाते : डॉ. पंजाबराव देशमुख |
| १५. | प्रा. दत्तात्रेय हिरामणराव टेकाळे | : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय शेतीविषयक विचार |
| १६. | प्रा. बाळासाहेब कचरू गायकवाड | : प्रवरानगर परिसरातील शैक्षणिक विकासातील पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांचे योगदान |
| १७. | Dr. Sambhaji Anandrao More | : A study of Radhanagari dam One of the Economic Approach of Chhatrapti Shahu Maharaj |
| १८. | Prof. Dinkar Raoji Murkute | : Satyashodhak Samaj And Krishnarao Bhalekar |
| १९. | स्वप्ना तुळशीराम संगमवार | : नांदेड जिल्ह्यातील महादेव कोळी जमातीचा इतिहास |
| २०. | डॉ. एस. के. भदरगे | : पी. जे. रोहम यांचे संतती नियमनावरील भाषण - एक अभ्यास |
| २१. | डॉ. एस. एन. गायकवाड | : माणदेशातील दुष्काळ |
| २२. | सतीश यशवंत चौगुले | : क्रांतिवीर डॉ. पद्मभूषण नागनाथ अण्णांचा हुतात्मा पॅटर्न : सहकार चळवळीत एक नवा आदर्श |
| २३. | प्रा. डॉ. प्रशांत देशमुख | : भुसावळ येथील ख्रिश्चन स्मशानभूमीतील महत्त्वपूर्ण कबरलेख |
| २४. | प्रा. सौ. अश्विनी सोमनाथ रोडे | : हैद्राबाद संस्थान महाराष्ट्र परिषदेचे कार्य |
| २५. | डॉ. ओ.व्ही.लिंगाडे | : भारतीय राष्ट्रध्वजाच्या विकासात पिंगल्लम वेंकय्या यांचे योगदान |
| २६. | प्रा. भूषण निकुरे | : बाबा आमटे यांचे 'भारत जोडो' अभियान |



Scanned by CamScanner

# २३. भुसावळ येथील ख्रिश्चन स्मशानभूमीतील महत्त्वपूर्ण कबरलेख

**प्रा. डॉ. प्रशांत देशमुख**
आप्पासाहेब र.भा.गरूड कॉलेज, शेंदुर्णी, जि. जळगाव.

**प्रस्तावना :**

भारतात दफनभूमी अथवा स्मशानभूमी याबावत अनेक गैरसमजुती आहेत. एक अभद्र आणि अपवित्र स्थळ म्हणजे स्मशानभूमी अशी एक मानसिकता आहे. पाश्चात्य देशात मात्र एक सुंदर, रमणीय आणि प्रेक्षणीय जागा म्हणजे स्मशानभूमी. ख्रिश्चन स्मशानभूमी बहुतांश चर्चपासून जवळच्या अंतरावर असतात. एक विस्तृत प्रदेश आणि निसर्गरम्य ही संकल्पना पाश्चात्य देशात आहे. ओल्ड टेस्टामेंटमध्ये नमूद करण्यात आले आहे की, 'All roads ends at the grave.' थॉमस फुलर नमूद करतो की, 'सर्वांनी एकत्र जागण्याची जागा म्हणजे थडगे अथवा कबर.' The gave is the general meeting place. सर्व प्राण्यांना नेमून दिलेले घर म्हणजे थडगे. The gave is house appointed for all living.[1] प्रसिद्ध साहित्यिक फादर फ्रान्सिस दिब्रिटो नोंदवितात की, 'प्रत्येक कुटुंबाच्या मालकीचे संगमरवरी दगडांनी बांधलेले राखीव थडगे दफनभूमीत असते. त्या कुटुंबातील व्यक्तींचेच तिथे दफन होते. सर्वसाधारण थडग्याचा आकार 8 x 3 फूट असतो. स्मृतीका शिला दोन अडीच फूटांची, बाजूला बायबलमधील एखादा प्रसंग जीवंत सुवक शिल्प असते... माणूस मृत्यूला भीत असतो. सर्वसामान्य माणसाला मृत्यू म्हणजे विनाश वाटतो आणि विनाश कोणाला प्रिय असतो! डोकीवरचे जगण्याचे ओझे अवजड झाले म्हणजे अधूनमधून दफनभूमीत फेरफटका मारावा. थडग्यावर उमललेल्या फूलांतून आणि तेवणाऱ्या वार्तीमधून माणसाच्या मनातील अदम्य आशेचे दर्शन घडते.[2] असे वर्णन दफनभूमीवाबत त्यांनी केले आहे.

ख्रिश्चन धर्मियांत २ नोव्हेंबर हा दिवस मृतांचे स्मरण करण्याचा दिवस होय. यादिवशी मृतांचे वारस स्मशान भूमीत येऊन स्मरण करतात. मृत व्यक्तीच्या कबरीवरील लेखात त्याच्या कार्य कर्तृत्वाची, जन्म, मृत्यू इ. ची नोंद असते. महाराष्ट्रात ख्रिश्चन समाजाच्या वस्तीच्या ठिकाणी चर्च आणि अन्य सेवासुविधा स्थानके होती. या वसाहतीत चर्च, निवासस्थाने, शाळा, दवाखाने, क्लब, छावण्या इ. बरोबर स्मशानभूमीही होत.

महाराष्ट्रात ब्रिटिशकाळात निर्माण स्थापत्य रचना प्रसिद्ध आहेत. उदा. शिवाजी टर्मिनल्स इ. ख्रिश्चन स्मशानभूमी ही महत्त्वपूर्ण आहेत. शिवडी, पुणे, नागपूर, कोल्हापूर,



मिरज, सांगली, औरंगाबाद, जालना, आंबेजोगाई, हिंगोली, भुसावळ, जळगाव, आसई इ. या ठिकाणच्या स्मशानभूमीतील कबरलेख स्थानिक इतिहासाच्या आणि आधुनिक इतिहास लेखनाच्या दृष्टीकोनातून एक महत्त्वपूर्ण ऐतिहासिक पूरातत्वीय Historical as well as archeological साधन आहेत.

शिलालेख हे विविध भाषा आणि लिपीत आढळतात. स्मृतीलेख, स्तंभलेख, पायरीलेख, द्वारलेख, भीतिलेख, समाधीलेख इ. शिलालेखाचेच प्रकार होत. स्मशानभूमीत कबरीवर असणाऱ्या लेखात त्याच्या कार्याची नोंद, जन्म, मृत्यूची नोंद, वारस, नातेसंबंध इ. चा उल्लेख असतो. थोडक्यात मृत व्यक्तीचे ती संक्षिप्त जीवन नोंद असते. भुसावळ येथील ख्रिश्चन स्मशानभूमीतील कबरींची नोंद प्रस्तुत शोध निबंधात घेतली आहे. भुसावळ जि. जळगाव जिल्ह्यातील एक महत्त्वपूर्ण रेल्वे जंक्शन होय. २१°०५ उत्तर ७५°१० पू. अक्षांक्ष आणि रेखांशीय ठिकाण होय. भुसावळचा खऱ्या अर्थाने गतिमान विकास १८६३ इ.स. नंतर रेल्वे सुरू झाल्यानंतर झाला.[3] मुंबई - दिल्ली, मुंबई - कलकत्ता मध्ये रेल्वे मार्गावरील महत्त्वपूर्ण जंक्शन भुसावळ होय. तापीनदीच्या पात्राजवळच ख्रिश्चन स्मशानभूमी भुसावळ येथे आहे. या स्मशानभूमीत १०० - १५० कबरी आहेत. यापैकी बहुतांश कबरीवर कबरलेख आहे. मात्र चुना आणि रंग यामुळे कबरलेख दिसत नाहीत. वाचनीय राहिले नाहीत. यातील काही कबरलेखांची नोंद प्रस्तुत संशोधकाने घेतली आहे. भुसावळ येथे रेल्वे, चर्च, छावणी इ. मुळे ख्रिश्चन वस्ती वाढली. भुसावळचा विकास घडला. गावसंस्कृतीचे रूपांतर शहरी संस्कृतीत पाश्चात्य वसतीस्थानाप्रमाणे घडले.

| क्र. | नाव | पु./स्त्री | जन्म दिनांक | मृत्यु दिनांक | वय |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Robert David Jones | पु | 10th April 1891 | 10th Sept. 1924 | 33 |
| 2. | Millicent Dorothy Irene | स्त्री | - | - | - |
| ३. | Giurgmma Wilhelmma Shaw | स्त्री | 1878 | 21st April 1938 | 60 |
| 4. | Richard Freemao | पु | - | 14th Sept. 1940 | |
| 5. | Diond Philomena Athaide | स्त्री | 16th July 1938 | 22nd Jan. 2004 | 66 |
| 6. | James Henry Mulholland | पु | | 22nd April 1934 | 68 |
| 7. | Mrs. Marie Fernandez | स्त्री | 6th April 1883 | 2nd March 1941 | 58 |
| 8. | Benswace Saunderes | पु | - | 6th April 1939 | 68 |
| 9. | Charles Orromew D'Souza | पु | 20th Oct. 1894 | 17th August 1939 | 45 |
| 10. | Robert Gill | पु | 1804 | 10th April 1879 | 75 |

**भुसावळ ख्रिश्चन स्मशानभूमीतील महत्त्वपूर्ण कबरलेख वर्णन आणि वाचन.**

I. रॉबर्ट डेव्हिड जोन्स : 1891 - 1924 कबरलेख बायबलप्रमाणे दर्शविलेल्या धर्मग्रंथांच्या दोन्ही बाजूवर नोंदविला आहे. डाव्या बाजूला नाव, जन्म, मृत्यु दिनांक तर उजव्या बाजूला मजकूर नोंदविला आहे.

*In loving husband of My R. Darling Husband*
*Robert David Jones*
*Born 10th April 1891*
*Died 10th Sept. 1924*
*Yeh Tho I WALK*
*Throught the walk*
*of the shadow of Death*
*I will Fear No fail*
*For Thou Art With me*
*Thy Rod And Thy staff*
*They shall comform me.*[4]

II. Millicent D. Irene : च्या कबरलेखावर नमूद आहे की, In loving memory of Millicent Dorothy Irene dearly loved wife of F.W.R. Bangs[5]

III. Giurgmma Wilhemma Show : हीची कबर अत्यंत आकर्षक आहे. कबरीवर संगमरवरात पुष्पच कोरण्यात आलेले आहे. यावर नमूद आहे की, Mother Rest in peace Artibuto in the cheri.... memory of our beloved mother Giurgmma wilhemma shaw who left us for the heavenly home on the 21st April 1938. Aged 60 years a loving mother you seen. For all of us you did your best God grant you now eternal Rest.[6]

IV. Richard Freemao[7] : In loving memory of Richard freemao died 14th September 1940.

V. Diana Philomena Athaidne : 1938 -2004 : भुसावळ येथील डायना ही मिस इंडिया युनिवर्स १९६०-६१ मध्ये राहिली. डायनाच्या कबरीवर नमूद आहे की, In Loving memory of Diana Philomena Athaide Nee Valentine former Miss India and Universe 1960/1961. Born 16.07.1938 Died 22.01.2004 A Dear Wife, Mother, Mother in law, Grandmother R.I.P.[8]

VI. James Henry Mulholland[9] : यांच्या कबरलेखावर नमूद आहे की, In loving memory of James Herny Mulholland who feel a sleep in Jesus on the 22nd April 1931 Aged 08 years and 11 months.

VII. Mrs. Marie Fernandez [10] : In loving memory of our Darling mother Mrs. Marie Fernadez Born on 6th Aug. 1883 Died on 2nd March 1941.

VIII. Bensace Saunders[11] : In loving memory of my beloved Husband and father Bensace Saunderes who died on the 6th





April 1939 aged 68 years 08 months and 05 days. R.I.P.

IX. Charles Dsouza[12] : In loving memory of Charles Orromeo Dsouza luto carriage inspector Bhusawal Born 20th Oct. 1894 Died 17th Aug. 1939.

X. स्मशानभूमीत प्रवेश द्वाराजवळ एक अत्यंत महत्त्वपूर्ण कबर आहे. जगप्रसिद्ध अजिंठ्याच्या लेण्याचा शोधक रॉबर्ट गिल हा नेटीव्ह इन्फेन्टरी ४४ मध्ये अधिकारी होता. संगमरवरात क्रूसवर कोरलेल्या कबरलेखावर नमूद आहे की, 'In memoriam Major Robert Gill of Ajunta 44th Reg. N.I. Died 10th April, 1879 Aged 75. Requiescat in peace[13].

**सारांश**

भुसावळ येथील ख्रिश्चन स्मशानभूमीतील कबरलेख हे दर्शवितात की भुसावळच्या आधुनिक जडणघडणीत ख्रिश्चन समाजाने महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्याला ऐतिहासिक पुरातत्वीय साधन म्हणून महत्त्व आहे. १९व्या शतकाच्या उत्तरार्धात विशेषत: मध्यरेल्वेचे स्थानक जंक्शन म्हणून विकास झाला. या विकासात रेल्वे कर्मचारी, इंजिनिअर्स, फादर, छावणी अधिकारी यांच्या कबरी स्मशानभूमीत आहेत. अंजिठा लेणीचा संशोधक मेजर रॉबर्ट गिल याच स्मशानभूमीत चिरविश्रांती घेत आहे. Geneology च्या दृष्टिकोनातून ही स्मशानभूमी महत्त्वपूर्ण आहे. रॉबर्ट गिलच्या कबरीस भेट देण्यास देश-विदेशी पर्यटक येथे येतात.

**संदर्भ :**


१. देशपांडे एम. के., ए डिक्टानरी ऑल इंग्लिश, कोटेरानस् अॅल प्रोवब्स, इंग्लिश सुवचनांचा कोश, राणे प्रकाशन, पुणे १९७३, पृ. १८४-१८६.
२. दिब्रिटो, फादर फ्रान्सिस : ओॲसिसच्या शोधात, राजहंस प्रकाशन, पुणे ३०, प्रथमावृत्ती, १९९६, पृ. १९५, २०५.
३. चौधरी, कि.का. संपा., महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर जळगाव जिल्हा, महाराष्ट्र शासन, दर्शनिका विभाग, मुंबई, १९९४, पृ. ७९६.
४. *Christ and Graveyard - Bhusawal - Tombof Robert David Jones - epitaph*
५. *Ibid, Tomb of Millicent Dorothy Irene, epitaph.*
६. *Ibid, Tomb of Mother Giurgmma, epitaph.*
७. *Ibid, Tomb of Richard Freemao, epitaph.*
८. *Ibid, Tomb of Diana Philomena Athaidne, epitaph*
९. *Ibid, Tomb of James Henry Mulholland, epitaph*
१०. *Ibid, Tomb of Mrs. Marie Fernadez, epitaph*
११. *Ibid, Tomb of Bensace saunders, epitaph*
१२. *Ibid, Tomb of Charles Dsouza, epitaph*
१३. *Ibid, Tomb of Major Robert Gill, epitaph*




Scanned by CamScanner